# पालिका आणि अग्निशमन अधिकाऱ्यांना बेड्या ठोका! नाहीतर फक्त 'रेट' वाढेल!

**विशेष संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे कृत**

आज कमला मिलमधील आगीत जे दुर्दैवी मृत्यू झाले त्याला दोन्ही रेस्टॉरंटचे मालक जबाबदार आहेत. त्यांच्यावर फास्टट्रॅक कोर्टात सुनावणी घेऊन शिक्षा झाली पाहिजे. इतर सर्व मालकांवर जरब बसावा यासाठी झटपट निर्णय आवश्यक आहे. या मालकांबरोबरच पालिकेचे अधिकारी आणि अग्निशमन दलाचे अधिकारी यांना ताबडतोब बेड्या ठोकल्या पाहिजेत. रेस्टॉरंटचे मालक हे पैसा कमवायला गैरधंदे करतात, पण ज्यांना जनतेची सुरक्षा बघायची आहे ते भ्रष्टाचारी वागतात तेव्हा त्यांच्यावर सर्जिकल स्ट्राईक होणे जास्त महत्त्वाचे आहे. ही आग ज्या वॉर्डात लागली त्या जी साऊथ वॉर्डातील वरिष्ठ पालिका अधिकारी आणि अग्निशमन अधिकारी यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून २४ तासांत त्यांची रवानगी पोलीस कोठडीत झाली पाहिजे. आधी पोलीस कोठडी, मग निलंबन आणि त्यानंतर चौकशी हा घटनाक्रम झाला तरच चौकशी विनादबाव होईल आणि यापुढे निष्पापांच्या जीवाशी खेळ होणार नाही. पालिका आणि अग्निशमन अधिकाऱ्यांना वठणीवर आणले नाही तर अशा दुर्घटना सातत्याने घडत राहतील.

मुंबई मायानगरीत पैसे कमविण्यासाठी काळा पैसा ओतून वाटेल ते करणारे अनेकजण आहेत. अशा आगी लागल्या तरी त्यांचे मोठे नुकसान कधीच होत नाही. कारण काळा पैसा अति प्रमाणात झाल्याने अशा गैरधंद्यात त्यांनी गुंतवणूक केलेली असते. एका आगीत त्यांचा एक टक्का काळा पैसा जळत असेल. त्यामुळे त्यांचे काहीच बिघडत नाही. कमला मिलच्या आगीत काहीजण दगावले म्हणून या मालकांवर गुन्हा तरी दाखल झाला. जर कुणी दगावले नसते तर आणखी काही पैशांची पुडकी टाकून हे प्रकरण त्यांनी दाबून टाकले असते. अशा या राक्षसीवृत्तीची वेगाने वाढ होत आहे. त्यांना केवळ पालिका, पोलीस आणि अग्निशमन दल रोखू शकते. पण त्या तीनही शक्ती दुर्दैवाने भ्रष्टाचाराने पूर्ण पोखरल्या आहेत. या तीन शक्तींचा रुबाब केवळ कर व्यवस्थित भरून नाकासमोर चालणारे मध्यमवर्गीय आणि पोटासाठी वणवण करणारे गरीब यांच्यावरच चालतो. मध्यमवर्गीय आणि गरिबांची बेकायदा बांधकामे असतात तरी काय? घरासमोरची गॅलरी आत घ्यायची किंवा पावसात ताडपत्री टाकून स्वत:चा बचाव करायचा. याहून जास्त काही करायला ते धजावतच नाहीत कारण हेच पालिका, अग्निशमन आणि पोलिसातील लांडगे त्यांच्यावर सतत नजर ठेवून गुरगुरत असतात.

पण श्रीमंतांपुढे ही लांडग्यांची झुंड हात जोडून उभी असते. गच्चीवर रेस्टॉरंट चालवायला अजून सरकारी परवानगी नाही तरी बिनधास्त रेस्टॉरंट सुरू होतं. हे रेस्टॉरंट एका निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याच्या मुलाचं आहे म्हणून जास्तच लाड केले होते. शेजारी हुक्का पार्लरही जोरात होतं. अग्निरोधक यंत्रणा नव्हती. अग्निशामक दलाचे बंब आले तेव्हा या इमारतीला पूर्ण काचा असल्याने त्यांना बचावकार्यात अडथळा आला. हे सर्व लपूनछपून सुरू नव्हते. खुलेआम सुरू होते. गणेशोत्सवात रात्री १० नंतर वाद्य बंद करणाऱ्या पोलिसांना कमला मिलमध्ये पहाटे ३ पर्यंत सुरू असणारा दणदणाट ऐकू येत नव्हता हे खोटे आहे. पालिकेचे अधिकारी सह्या करून परवानगी देतात, पोलीस अधिकारी डोळे मिटून कानात बोळे घालून घेतात आणि अग्निशमन दलाचे अधिकारी त्या गल्लीत फिरकतच नाहीत. यामुळेच गैरधंदे जोमात आहेत. कमला मिलच्या आगीत मृत झालेल्यांचे हेच खरे खुनी आहेत.

आज दिवसभर पालिकेत बोंबाबोंब होईल, संसदेत चौकशीची मागणीही केली गेलीय, सरकारचे आदेश सुटलेत, समित्या घोषित होतील, सर्व बाबी घडतील आणि विस्मृतीत जातील. या घटनेची चौकशी सुरू करण्यापूर्वी पालिका आणि अग्निशमन दलाच्या संबंधित अधिकाऱ्यांना जर बेड्या ठोकल्या नाहीत तर अशा प्रत्येक दुर्घटनेनंतर जे घडते ते होईल. चौकशी समितीचा केवळ फार्स होईल आणि या लांडग्यांचा 'रेट' वाढेल.